## हर घर तिरंगा ...

दि.१० ऑगस्ट रोजी सायकल फेरी च्या शुभारंभ निम्मित तिरंगा प्रतिज्ञा घेताना मा .जिल्हाधिकारी सिद्धाराम सलिमठ,आयुक्त यशवंत डांगे






अहमदनगर महानगरपालिका
२००३
निरंतर नगरसेवा
भव्य
सायकल रॅली
यशवंत डांगे, आयुक्त

लोकमत

महापालिकेचा उपक्रम : सायकलपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# ‘हर घर तिरंगा’ जागृतीसाठी सायकल रॅली

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर** : हर घर तिरंगा अभियानाच्या जनजागृतीसाठी महानगरपालिकेच्यावतीने शहरात विविध उपक्रम राबविले जात आहेत. शुक्रवारी विद्यार्थ्यांच्या सहभागातून प्रभातफेरी काढल्यानंतर शनिवारी सकाळी अहमदनगर सायकलिस्ट असोसिएशनच्या सहकार्याने शहरातून सायकल रॅली काढण्यात आली होती.

सायकल रॅलीचा शुभारंभ जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते झाला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून रॅलीला सुरुवात झाली. तेथून माळीवाडा पंचवीर चावडी माणिक चौक कापड बाजार तेलिखुंट-चितळे रोड दिल्ली गेट लाल टाकी पत्रकार चौक तारकपूर डीएसपी चौक रामचंद्र खुंट हातमपुरा बंगाल चौकीपासून पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे रॅलीची सांगता झाली.



हर घर तिरंगा अभियानाच्या जनजागृतीसाठी मनपाच्यावतीने आयोजित सायकल रॅलीला हिरवा झेंडा दाखविताना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येत आहे. आपल्या शहरात प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकवून नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे. स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

आयुक्त डांगे म्हणाले, शुरवीरांचे स्मरण करून हर घर तिरंगा अभियान राबवावे. महानगरपालिकेच्या वतीने जनजागृतीसाठी प्रभातफेरी, सायकल रॅली, मॅरेथॉन, सह्यांची मोहीम आदी उपक्रम राबवले जात आहे. महानगरपालिकेमार्फत काही प्रमाणात तिरंगा ध्वज वितरित करण्यात येणार आहेत. नागरिकांनी हे अभियान यशस्वी करावे.

सायकल रॅलीसाठी अहमदनगर सायकलिस्ट असोसिएशनच्यावतीने शरद काळे यांनी सहकार्य केले. रॅलीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी मेहेर लहारे यांनी पार पाडली. महानगरपालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे, घनकचरा विभागप्रमुख अशोक साबळे, स्टोअर विभागप्रमुख अशोक जाधव, प्रसिद्धी विभागप्रमुख शशिकांत नजन तसेच नितीन पाठक, अमित कुलकर्णी, मनोज येरगटूल, डॉ. धनंजय राजगुडे, सार्थक लोहार, संभाजी मोहिते, अभिजीत मिसाळ अमर अग्रवाल, महेंद्र येनगुल, अविनाश शिरापुरी, अमोल बोल्ली, मीनाक्षी पाठक माधुरी आडेप, अनुश्री गुंजाळ आदी या उपक्रमात सहभागी झाले होते.

लोकमत

# प्रत्येक घरावर तिरंगा फडकवा

## आयुक्त यांचे आवाहन : १३ ते १५ ऑगस्टदरम्यान उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर** : केंद्र शासनाच्या निर्देशानुसार शहरात महापालिकेच्या वतीने यावर्षीही स्वातंत्र्य दिनानिमित्त १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत 'हर घर तिरंगा' अभियान राबवण्यात येत आहे. शहरातील रहिवाशांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकावून या अभियानात सहभागी व्हावे व स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

हर घर तिरंगा अभियानाच्या जनजागृतीसाठी, नागरिकांना अभियानात सहभागी करून घेण्यासाठी महानगरपालिका विविध उपक्रम राबवत आहे. याचाच भाग म्हणून शुक्रवारी सकाळी मनपा व रेसिडेन्शिअल हायस्कूलच्या संयुक्त विद्यमाने शहरातून रॅली काढण्यात आली. रेसिडेन्शिअल हायस्कूल येथून



हर घर तिरंगा अभियानांतर्गत रेसिडेन्शिअल विद्यालयातून काढण्यात आलेल्या रॅलीचा महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्याहस्ते शुभारंभ झाला.

रॅलीला सुरुवात झाली. यावेळी प्रांताधिकारी सुधीर पाटील, उपायुक्त विजयकुमार मुंडे, सहायक उपायुक्त मेहेर लहारे, रेसिडेन्शिअलचे प्राचार्य विजयकुमार पोकळे, शिक्षणाधिकारी बुगे, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर आदी उपस्थित होते. तेथून निलक्रांती चौक, सिद्धीबाग, तोफखाना, बागडपट्टी, नेता सुभाष चौक, चितळे रोड, चौपाटी कारंजा, दिल्लीगेटमार्गे पुन्हा रेसिडेन्शिअल हायस्कूल येथे रॅलीची सांगता झाली.

याप्रसंगी बोलताना आयुक्त डांगे म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या स्वातंत्र्यसैनिक व शूरवीरांनी बलिदान दिले, त्यांचे स्मरण करा.

# हर घर तिरंगा अभियानात सहभागी व्हावा

## आयुक्तांचे आवाहन; प्रत्येकाने घरावर तिरंगा फडकावा

**नगर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या वर्षीही स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा अभियान राबवण्यात येत आहे. शहरात प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकावून नागरिकांनी अभियानात सहभागी व्हावे. स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन अहमदनगर महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

हर घर तिरंगा अभियानाच्या जनजागृतीसाठी, नागरिकांना अभियानात सहभागी करून घेण्यासाठी महानगरपालिका विविध उपक्रम राबवत आहे. गुरुवारी महापालिका व रेसिडेन्शियल हायस्कूलच्या संयुक्त विद्यमाने शहरातून रॅली काढण्यात आली. रेसिडेन्शियल हायस्कूल येथून रॅलीला सुरुवात झाली. तेथून नीलक्रांती चौक, सिद्धीबाग, तोफखाना, बागडपट्टी, नेता सुभाष चौक, चितळे रोड, चौपाटी कारंजा, दिल्लीगेटमार्गे पुन्हा रेसिडेन्शियल हायस्कूल येथे रॅलीची सांगता झाली.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या स्वातंत्र्यसैनिक व शूरवीरांनी बलिदान दिले, त्यांचे स्मरण करून हर घर तिरंगा अभियान राबवावे. शहरात प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकावला जावा, यासाठी सर्व नागरिकांनी अभियानात सहभागी व्हावे. महानगरपालिकेच्या वतीने जनजागृतीसाठी प्रभात फेरी, सायकल रॅली, मॅरेथॉन, सह्यांची मोहीम आदी उपक्रम राबवले जात आहेत. स्वातंत्र्याचा उत्सव संपूर्ण शहरात उत्साहात साजरा व्हावा, यासाठी महानगरपालिकेमार्फत काही प्रमाणात तिरंगा ध्वज वितरीत करण्यात येणार आहेत.




नगर : हर घर तिरंगा अभियानांतर्गत मनपा व रेसिडेन्शिअल हायस्कूलतर्फे शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली.

लोकमत

# आपलं नव्हे, माझं शहर म्हणा अन् स्वच्छतेत सहभागी व्हा

## आयुक्तांचे आवाहन : मनपाच्यावतीने शहरात स्वच्छता अभियान

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर** : शहराचे आरोग्य चांगले राहण्यासाठी स्वच्छता खूप महत्त्वाची असून, आता आपलं नव्हे तर माझं शहर म्हणा आणि स्वच्छता अभियानात स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

स्वच्छतेसाठी सातत्याने पुढाकार घेणाऱ्या सामाजिक संस्था, प्रतिष्ठान व मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी शहरातील अशोक हॉटेल ते सक्कर चौक परिसरात उड्डाणपुलाखाली स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

याप्रसंगी डांगे उपस्थितांना मार्गदर्शन करताना बोलत होते. याप्रसंगी दुभाजकालगत साचणारी माती, कचरा, प्लास्टिक व इतर कचरा उचलण्यात आला. प्रतिष्ठानच्या सदस्यांसह आयुक्त डांगे यांनी स्वतः साफसफाई करत अभियानात सक्रिय सहभाग घेतला. यावेळी प्रभारी उपायुक्त सपना वसावा, घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख अशोक साबळे, स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.





**नगर शहरात महापालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानात आयुक्त यशवंत डांगे यांनी स्वत: साफसफाई करत स्वच्छतेबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले.**

### रस्त्यावर नको कचरा

डांगे म्हणाले, आपलं शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांनीही पुढाकार घेतला पाहिजे. महानगरपालिकेकडून स्वच्छतेसाठी उपाययोजना केल्या जात आहेत. नागरिकांनीही रस्त्यावर कचरा टाकू नये. आपल्या घराच्या परिसरात, कॉलनीत स्वच्छता राहण्यासाठी प्रयत्न करावेत.